परिवर्तनाचा

# वाटसरू

# कृत्रिम बुद्धिमत्तेचे अंधारयुग

Scanned by CamScanner

# परिवर्तनाचा वाटसरू

वर्ष २०वे / अंक ९वा / किं. २५ रु. / १ ते १५ सप्टेंबर २०२०

संस्थापक संपादक
अभय कांता*

संपादक
प्रज्ञा दया पवार । नारायण भोसले । माधुरी दीक्षित । सुरेंद्र जोंधळे

व्यवस्थापकीय संपादक
प्रशांत पवार

कार्यकारी संपादक
देवेंद्र इंगळे । दिलीप चव्हाण

संपादक मंडळ
अवधूत डोंगरे, प्रज्वला तट्टे, वीरा राठोड, कलीम अजीम, मयुरी सामंत, अजित अभंग, राही श्रु. ग., वृषाली मगदूम

सहव्यवस्थापक
शुभम जाधव

संपर्क पत्ता
५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ ए, कसबा पेठ, फणी आळी तालमीजवळ, पुणे ४११०११
भ्र. ७०२८२०२०९१ इमेल : pwatsaru@yahoo.com वेबसाईट : www.pvatsaru.com

वर्गणीचे दर : वार्षिक : ४५० रु., त्रैवार्षिक : १२०० रु., दशवार्षिक : ३,५०० रु., सॉफ्ट कॉपीसाठी वा. व. ३५० रु., सॉफ्ट + छापील ६५० रु. वरील पत्त्यावर इ मनी ऑर्डर, चेक किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठवावी. 'परिवर्तनाचा वाटसरू' या नावाने चेक/डिमांड ड्राफ्ट असावा.

बँक ट्रान्सफरने वर्गणी भरण्यासाठी तपशील
बँक ऑफ इंडिया, फर्ग्युसन कॉलेज रोड शाखा, पुणे । बचत खाते : परिवर्तनाचा वाटसरू
बचत खाते क्र. : 051410110013969 । आयएफएससी क्र. : BKID0000514 । एमआयसीआर क्र. : 411013014

*पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी

ISSN: 2250-3145

युजीसी केअर ग्रुप 1मध्ये 'परिवर्तनाचा वाटसरू' पाक्षिकाचा मल्टिडिसिप्लिनरी या कोटीक्रमांतर्गत समावेश केला आहे.




Scanned by CamScanner

# अ नु क्र म


संपादकीय ५

**समसामायिक**

जातीय भेदभावाचा परदेशी डंका ७
अंकुश कदम

**विशेष लेख**

कृत्रिम बुद्धिमत्तेचे अंधारयुग ९
मिलिंद कीर्ती

पराकोटीचे सॅनिटेशन घातकच २१
सुभाष दोंदे

शाश्वत विकासाची दिशा २६
सम्राट कसबे व संपत काळे

**अमेरिकानामा**

काही आत्मवृत्ते व जिवंत हकिकती ३८
मुक्ता मनोहर

**वि–भान**

प्रकाश प्रदूषण : दिव्याखाली अंधार ४१
सुनीती धारवाडकर

**साहित्य**

भास्कर चंदनशिव : भूमी आणि भूमिका ४५
केदार काळवणे



अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.





Scanned by CamScanner

# भास्कर चंदनशिव : भूमी आणि भूमिका

केदार काळवणे

भास्कर तात्याबा चंदनशिव यांचा जन्म १२ जानेवारी १९४५ रोजी उस्मानाबाद जिल्ह्यामधील कळंब तालुक्यातील हसेगावसारख्या छोट्याशा खेड्यात राबत्या शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे मूळ नाव भास्कर देवराव यादव हे आहे. दत्तकविधानानंतर ते भास्कर तात्याबा चंदनशिव झाले. जन्मजात शेतीमातीचा संस्कार त्यांच्यावर झाला. अक्षरगंध नसलेल्या कुटुंबातून त्यांचा अक्षरप्रवास सुरू झाला. वडील निरक्षर असले तरी त्यांनी मुलाने वकील झाले पाहिजे या जिद्दीने त्यांना शिकवले. परंतु ते वकील होऊ शकले नसले तरी त्यांनी आपल्या वक्तृत्व आणि लेखनातून ग्रामीण समाजाच्या प्रश्नांची बाजू जोरकसपणे मांडत प्रबोधन पर्वाचे वाटेकरी होण्याचे श्रेय मात्र जरूर मिळवले. त्यांचे शालेय शिक्षण हसेगाव येथे; तर माध्यमिक शिक्षण कळंबला झाले. शाळेत असताना त्यांना चित्रकलेची आवड होती. हा छंद खर्चिक असल्याने पुढे तो त्यांना जोपासता आला नाही. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण अंबाजोगाई येथे झाले. महाविद्यालयातील सांस्कृतिक आणि वाङ्मयीन उपक्रमामुळे ते साहित्य लेखनाकडे वळले. औरंगाबाद येथे पदव्युत्तर शिक्षण घेत असताना या लेखनाला परिपक्वता प्राप्त झाली. विद्यापीठाच्या मराठी विभागातील नामवंत शिक्षकांच्या अध्यापनाचा संस्कार आणि साहित्यिक मित्रांच्या चर्चा-सहवासामुळे त्यांचे लेखन बहरले. याच काळात(१९७०) औरंगाबाद येथील मिलिंद महाविद्यालयाने अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ राज्यस्तरीय कथा स्पर्धा आयोजित केलेली होती. या स्पर्धेत त्यांची 'मसणवटा' ही कथा राज्यात प्रथम पारितोषिकाची मानकरी ठरली आणि तेथून त्यांच्याकडून साहित्यिक वर्तुळात मोठ्या लेखनापेक्षा निर्माण झाल्या. तेथूनच त्यांना साहित्यिक मान्यताही मिळाली. वाङ्मयीन शिक्षकांनी दिलेली वाङ्मयीन दृष्टी, महापुरुषांच्या लेखन-कार्याचे केलेले अवलोकन, शोषणाचा आशय मांडणाऱ्या साहित्याचे केलेले सूक्ष्म वाचन आणि दैनिक-नियतकालिकांनी त्यांना दिलेल्या लेखनसंधी यामुळे त्यांची सामाजिक व साहित्यिक भूमिका घडत गेली. ही भूमिका सामाजिक समतेचा पुरस्कार करणारी आणि मानवमुक्तीचा जागर घडविणारी आहे. या भूमिकेतूनच त्यांनी ह्यातभर लेखन केले.

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळातील विविध महाविद्यालयात त्यांनी इ.स.१९७२ ते इ.स.२००५ असे तेहतीस वर्षे मराठी विषयाचे अध्यापन केले. अध्यापन काळात शिक्षक म्हणून अनेक वाङ्मयीन उपक्रम राबविले. त्यांनी विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर,

लेखक कळंब (जि. उस्मानाबाद) स्थित शि. म. ज्ञानेश्वर मोहेकर महाविद्यालयात मराठीचे सहायक प्राध्यापक आहेत.
ईमेल- kedar.kalwane.28@gmail.com

जि. औरंगाबाद येथे घेतलेले 'ग्रामीण आत्मकथन शिबीर' विशेष उल्लेखनीय ठरलेले आहे. या शिबीरातून घडलेल्या लेखकांनी पुढे मराठीत कसदार लेखन केलेले आहे. साधारणत: १९७०पासून भास्कर चंदनशिव यांनी कथालेखनाला प्रारंभ केला. आजपावेतो त्यांचे पाच कथासंग्रह, दोन ललितलेख संग्रह, तीन वैचारिक-समीक्षापर ग्रंथ आणि पाच संपादने प्रकाशित झालेली आहेत. इ.स.१९६२ ते इ.स.१९७२ हा त्यांच्या वाङ्मयीन जडणघडणीचा काळ आहे. याच काळात त्यांनी दुष्काळाचा दाहक अनुभव घेतला. त्या अनुभवाच्या अनुषंगाने दुष्काळाच्या विविध पैलूंचा साकल्याने अभ्यासही याच काळात केला. यानिमित्ताने ग्रामीण जगण्याविषयीचे त्यांचे सखोल चिंतन झाले. या चिंतनातून शेती-शेतकऱ्यांच्या दु:खाचा तळठाव लक्षात आला. त्याचा परिणाम त्यांच्या लेखनावर झाला. अनुभव आणि अभ्यासाच्या एकसंधतेतून हे लेखन अधिक टोकदार झाले. ग्रामीणसह साठोत्तरी साहित्य चळवळींनी उदयाला आलेले समाजलक्ष्यी साहित्यशास्त्र आणि शेतकरी संघटनेने उभी केलेली सामाजिक चळवळ याचाही कळत नकळत परिणाम भास्कर चंदनशिव यांच्या लेखनाला आकार देण्यात झाला. इ.स.१९७० ते इ.स.२००० हा त्यांचा मुख्य लेखनकाळ आहे. या तीस वर्षात शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा वेध घेत त्यांनी केलेल्या कथात्मक, वैचारिक आणि समीक्षात्मक लेखनाला मराठी साहित्यात योगदानात्मक महत्त्व प्राप्त झाले आहे. शेती-शेतकरी आणि मानवी मूल्यांना केंद्रस्थानी ठेवून झालेली ही अभिव्यक्ती भारतीय साहित्यात मानाचे स्थान प्राप्त करणारी आहे.

या पार्श्वभूमीवर भास्कर चंदनशिव यांच्या साहित्याचे स्वरूप आणि प्रकृतीचा वेध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत विवेचनात केलेला आहे. भास्कर चंदनशिव यांची मराठी साहित्यातील ओळख ही कथाकार म्हणून असल्याने प्रारंभी त्यांच्या कथेची मर्मस्थळे विशद केलेली आहेत. 'जांभळढव्ह' (१९८०), 'मरणकळा' (१९८३), 'अंगारमाती'(१९९१), 'नवी वारूळं' (१९९२), 'बिरडं'(१९९९) असे पाच महत्त्वपूर्ण संग्रह आणि सात असंग्रहित कथा त्यांच्या नावावर आहेत. आजपर्यंत एकूण ८६ कथांचे लेखन त्यांनी केलेले आहे. या कथेतून ग्रामजीवनाच्या अंतरंगाचा बहुस्तरीय आलेख चंदनशिव यांनी मांडलेला आहे. ग्रामीण जीवनाचा विशाल पट या कथेने कवेत घेतला आहे. त्यामुळे त्यांची कथा ग्रामीण-दलित कथेची सीमारेषा संपवून भारतीय जीवनातील समाजवास्तवाचा परिपूर्ण पट साकार करते. त्यात त्यांचे समाजवास्तवाचे परिपूर्ण आकलन व्यक्त होतेच. त्यासोबतच त्यांच्या अन्वेषण दृष्टीने समाजवास्तव निर्मिणाऱ्या कारणांचा शोध आपल्या कथेतून त्यांनी घेतला आहे.[१] प्रामुख्याने ग्रामजीवनातील भीषण दु:खाचा आणि रात्रंदिवस त्या दु:खात पिचून गेलेल्या माणसांच्या जगण्याचा पट या कथेतून चित्रित झालेला आहे. खेड्यातील जगण्याच्या सातबाऱ्यावरील बारोमासच्या दारिद्र्य व भोगयातनांच्या नोंदी या कथेने केलेल्या आहेत. दुष्काळाने उद्ध्वस्त झालेल्या खेड्याचा चहुअंगी वेध चंदनशिव यांनी घेतलेला आहे. दुष्काळाने होरपळलेल्या खेड्याच्या वाताहतीचा दस्तावेज म्हणून ही कथा महत्त्वाची आहे. मराठी कथेत दुष्काळाची इतक्या सखोल व विस्तृतपणे अनुभूती प्रथमच या कथेने प्रकट केलेली आहे. त्यामुळेही चंदनशिव यांची कथा मराठी कथेत लक्षणीय ठरलेली दिसते.

खेड्यातील दलितांच्या जगण्याचा आणि दलित-सवर्ण संघर्षाचा विविध कोनातून अन्वयार्थ या कथेने लावलेला आहे. दलित जीवन गावगाड्याचा भाग असल्याने हे जीवनही ग्रामीण साहित्याचे आशयकेंद्र आहे; वा तोही ग्राम जाणीवेचा एक भाग आहे. त्या जाणीवेचा आविष्कार करणारे साहित्यही ग्रामीण साहित्य असते. याचे भान मराठी साहित्याला चंदनशिव यांच्या कथेने दिले. दलित जीवनाची समग्रपणाने जाणीव मराठी ग्रामीण साहित्यात त्यांच्या कथेने प्रकट केली आहे. त्यामुळेच दलित-ग्रामीण सीमारेषा पुसणारा कथाकार



Scanned by CamScanner

म्हणून त्यांची नोंद करता येईल. त्यांच्या कथांतील आशयसूत्रे, ग्रामीण आणि दलित सीमारेषा धूसर करून शोषणाचं निखळ रूप दाखवतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेतून प्रस्थापित केलेली स्वातंत्र्य, समता, बंधुत्व ही मूल्ये त्यांच्या कथेचा प्राण आहेत. ग्रामीण आणि दलित संवेदनशीलता एकत्रित मोजण्यासाठी चंदनशिव ह्यांची कथा आस्थेचा विषय होऊ शकते.[१] पूर्वापार काळापासून अनेकविध कारणांनी शेती-शेतकऱ्यांना संकटांचा सामना करावा लागलेला आहे. शेतीचा इतिहास हा शोषणाचा इतिहास आहे, असे म्हटले तरी ते चुकीचे ठरू नये. निसर्गाचा लहरीपणा आणि व्यवस्थेच्या मुक्या माराने त्याचे जगणे हतबल झालेले आहे, याचे वास्तवचित्र ही कथा उभे करते. शेतमालाच्या भावाचा प्रश्नही अत्यंत टोकदारपणे ही कथा हाताळते. भाकरीच्या प्रश्नाची वैविध्यपूर्ण अनुभूती या कथेने साक्षात केलेली आहे. लैंगिक भूकेने पछाडलेल्या आणि व्यवस्थेने विकृत बनवलेल्या माणसांचे जग या कथेने रेखाटलेले आहे. भारतीय समाजव्यवस्था पुरुषसत्ताक असल्याने खेड्यातील स्त्रियांना स्त्री म्हणून आणि ग्रामीण स्त्री म्हणून अशा दुहेरी शोषणाला सामोरे जावे लागते.अशा कुटुंब आणि गावगाड्याच्या चौकटीत वाट्याला आलेल्या स्त्रियांच्या भोगवट्याचे व्यापक जीवनदर्शन या कथेने घडवलेले आहे. यासह ग्रामीण जीवनातील राजकीय-सामाजिक-सांस्कृतिक-आर्थिक संघर्ष, माणसांच्या विविध कुरूप-सुरूप वृत्ती-प्रवृत्ती, ग्रामीण जीवनातील गतीशील वास्तव, बदलता गावगाडा आणि खेड्यातील सर्व वयोगटातील व्यक्तींचे जीवनचरित्र अशा अनेकविध आशयसूत्रांना कवेत घेऊन ही कथा 'गावपण' हरवत चालल्याची जाणीव ठळक करते. मूल्यव्यवस्थेच्या ऱ्हासाच्या कहाणीचे नवे प्रयोगशील रचित उभे करते.

खेड्यातील जातीयता, धर्मसत्ता, वर्गसंघर्ष, दुष्काळ, स्त्रीजीवन, पुरुषवर्गाची मानसिक-सामाजिक घुसमट, प्राणीसृष्टी, ग्रामजीवनातील स्थित्यंतरे, शेतीची पडझड, भूक, दुःख, दारिद्र्य, वेदना, उपेक्षा आणि शोषणपीडित माणूस आणि समूहाच्या जगण्याची गाथा या कथेने साक्षात केलेली आहे. ग्रामीण बोलीचा समाजविशिष्ट आणि प्रदेशनिविष्ट वापर या कथेत झालेला आहे. या कथेची भाषा आणि शैली पारंपरिक लोकसंचितातील रचनाबंधाचा स्वीकार करणारी आहे. आशय सहज-नैसर्गिकतेने सांगण्याच्या पद्धतीतून या कथेची शैली घडलेली आहे. सूचकता, काव्यात्मकता, प्रतीकात्मकता, चिंतनशीलता आणि वैचारिकता हे या कथाबंधाचे विशेष आहेत. विद्रोह हाही महत्त्वाचा गुणविशेष या कथेचा आहे. मराठवाड्यातील विशिष्ट भू-सांस्कृतिक जीवनरीतीचे बहुस्वरीय अनुभवविश्व या कथेतून मुखरित झालेले आहे. समकालीन वास्तवातील गुंतगुंत, माणसांची जैविक भूक, त्यांच्या विविध वृत्ती-प्रवृत्ती-स्वभावधर्म, खेड्यातील स्थित्यंतराची बहुविध कारणमीमांसा, आशयसंवादी बोलभाषेचा आविष्कार, कथाबांधणीतील प्रयोगशीलता आणि अनुभवाकडे पाहण्याची भूमिकानिष्ठ दृष्टी यामुळे ही कथा समकालीन कथेत वेगळी ठरत स्वतःचा स्वतंत्र ठसा उमटवते. सामाजिक आशयाच्या तीव्र दाबातून कलात्मक आकार धारण करत नवे कथन सांगू पाहणारी ही कथा एकूण मराठी आणि ग्रामीण कथेला आविष्कारशील बनवणारी आहे. म्हणूनच ही कथा महत्त्वाची मानली पाहिजे.

भास्कर चंदनशिव यांच्या कथेने मराठी कथेला आशयसमृद्ध बनवत वाङ्मयीन गांभीर्य दिलेले आहे. वाङ्मयीनदृष्ट्या सकस असणाऱ्या या अभिव्यक्तीने मराठी कथेला दिग्दर्शित करत योगदान दिलेले आहे. या कथेविषयी आसाराम लोमटे म्हणतात, प्रश्नांची समज, वर्गसंघर्षाचे भान आणि कलावंताची तटस्थता यामुळे त्यांची कथा केवळ 'वाचनीय' होत नाही, तर ती अस्वस्थ आणि अंतर्मुख करते. त्यांचे सशक्त सर्जन वर्गवारीच्या सीमा ओलांडून वाचकाच्या अंतःकरणात प्रवेशते. खरे तर असे समकालीन वास्तव पेलायला

लेखकाला सजगच असावे लागते. भूमी आणि भूमिका या दोन्हीवरही अतिशय ठामपणे उभे राहणाऱ्या चंदनशिव यांची कथा म्हणूनच मराठी साहित्यात लक्षणीय ठरली आहे.[४] भूमी आणि भूमिकेची ही कथा असल्यानेच ती अभिव्यक्तीचे नवे मानदंड प्रस्थापित करणारी ठरते. या भूमी आणि भूमिकेच्या आशयात मानवतावादी मूल्यदृष्टी आणि खेड्यातील माणसांची भवतालसृष्टी आहे. या दृष्टी आणि सृष्टीतून माणसांच्या जीवनजाणीवांची समग्रता भास्कर चंदनशिव यांनी कथेतून सूक्ष्मपणे प्रकट केली आहे. दुःख, वेदना, शोषण, दारिद्र्य हे घटक घेऊन त्यांची कथा उभी राहते. ती त्यांचे केवळ तपशील पुरवत बसत नाही तर त्यापाठीमागची कारणमीमांसा स्पष्ट करते. चंदनशिवांचा ग्रामीण जीवनाच्या सामाजिकतेच्या आकलनाचा आवाका फार मोठा आहे. छोटे-मोठे शेतकरी, दलित, स्त्री, पौगंडावस्थेतील मुले, शेतमजूर यांसहित अनेकविध आशय क्षितिजांना त्यांची लेखणी स्पर्श करते. एका परीने या वंचित घटकांचा ती इतिहासच नोंदवत असते.[५] यादृष्टीने या कथेची महत्ता आणि वेगळेपण लक्षात घेणे अवश्यक आहे. या कथेच्या प्रभावातून नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कथेने नवे वळण घेतले आहे. हे वळण ग्रामीण कथेला अधिक विकसित करणारे आहे. नव्वदोत्तर काळात उदयाला आलेल्या ग्रामीण कथेवर चंदनशिवांच्या कथेचा स्पष्ट प्रभाव नसला तरी या कथेने चंदनशिवांच्या कथेने निर्माण केलेल्या मानदंडांना वाट पुसत आपली कथा घडवली व विकसित केली आहे. हे भास्कर चंदनशिव यांच्या कथेचे मराठी कथेला मोलाचे योगदान आहे.

भास्कर चंदनशिव यांचे 'भूमी आणि भूमिका',(१९९२),'माती आणि मंथन'(२००१), व 'माती आणि नाती'(२००२) ही वैचारिक-समीक्षणात्मक लेखनाची पुस्तके मराठी विचारचिंतन परंपरेत आणि समीक्षेत मोलाची भर टाकणारी आहे. शेती-मातीच्या चिंतनक्षेत्राला केंद्रस्थानी ठेवून अभिजन-बहुजन संघर्षाच्या व्यापक पटाचे मूलगामी मंथन या लेखनातून घडलेले आहे. संस्कृती कलहाची ही विचारमीमांसा आणि लेखनार्थ बहुजनवादी चिंतनविश्वाला समृद्ध करणारा आहे. शोषित समूहांना परंपरा आणि इतिहास वाचनाची नवी दृष्टी देणारे हे लेखन आहे. परखडपणा व ससंदर्भता हा या लेखनाचा महत्त्वाचा गुणधर्म आहे. शेतकऱ्याच्या लुटीचा इतिहास, ग्रामपरिवर्तनाच्या चळवळी, स्वातंत्र्योत्तर काळातील शेतीविषयक चळवळी याविषयीचे मूलगामी चिंतन या लेखनाच्या कक्षेत सामावलेले आहे. सत्यशोधक चळवळीची कामगिरी आणि सत्यशोधक जलस्यांनी केलेले सामाजिक प्रबोधन, एकोणीसाव्या शतकातील सुधारणावादी संस्था आणि स्त्रीजन्म परंपरा व पुरुषी मानसिकतेचा समर्पक वेधही या लेखनाने घेतलेला आहे. साठोत्तरी काळात उदयाला आलेल्या ग्रामीण साहित्यासंबंधीही मूलभूत स्वरूपाची मांडणी चंदनशिव यांनी केलेली आहे. ग्रामीण आत्मकथन, ग्रामीण साहित्याची संकल्पना-परंपरा, ग्रामीण साहित्य आणि विद्रोही जाणीव, शेतकरी साहित्याची भूमिका; तसेच मराठी साहित्यातील राजवाडा, भिलाटी, गावठाण या अनुषंगाने त्यांनी केलेले विवेचन मराठी ग्रामीण साहित्याची प्रकृती स्पष्ट करणारे आहे. ही समीक्षा ग्रामीण साहित्य समीक्षेत महत्त्वाची ठरलेली आहे.

यासोबतच शेतकऱ्याच्या आसूडची शेतकरी धर्मग्रंथ म्हणून केलेली मीमांसा, इतिहास आणि वर्तमानाच्या संदर्भात इशारा या पुस्तिकेची सांगितलेली उपयोगिता, महात्मा फुले यांच्या शिवरायावरील पोवाड्याचे ऐतिहासिकतेच्या संदर्भात विशद केलेले महत्त्व ही सांस्कृतिक परिप्रेक्षात केलेली मीमांसाही मोलाची आहे. पाचोळा, झोंबी, फकिराचे अभंग, काट्यावरची पोटं, दशक्रिया, असं जगणं तोलाचं या साहित्यकृतींचे समाजशास्त्रीय मूल्यव्युह स्वीकारून केलेले मूल्यमापन मराठी उपयोजित समीक्षेत महत्त्वाचे ठरणारे आहे. याशिवाय महात्मा फुले यांच्या कार्यविचाराचा विस्ताराने वेध घेत त्यांचे लेखन-विचार आणि मराठी साहित्य



Scanned by CamScanner

अशी अनुबंध तपासणी केली आहे. स्त्रीमुक्तीची क्रांतीज्योत ताराबाई शिंदे आणि शेतकऱ्यांचे द्रष्टे नेते आणि समाजचिंतक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा आढावा भास्कर चंदनशिव यांनी घेतलेला आहे. क्रांतीसिंह नाना पाटील यांच्यासंबंधीच्या अनुभवाची नोंद आणि विठ्ठल रामजी शिंदे यांच्या शेतकरी चिंतनाचा यथोचित परामर्श या लेखनातून घेतलेला आहे. बी. रघुनाथ, व्यंकटेश माडगूळकर, अण्णाभाऊ साठे, रा. रं. बोराडे, चंद्रकुमार नलगे व महावीर जोंधळे यांच्या साहित्याची मर्यादा-सामर्थ्यांसह ताटस्थ्याने समीक्षा भास्कर चंदनशिव यांनी केलेली आहे. या लेखकांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आणि त्यांच्या लेखनातील मूल्यभानाचे नेमके अधोरेखन या समीक्षेने केलेले आहे.

नव्वदोत्तर काळात ग्राम संवेदनशीलतेतून गावगाडा, बदलता गाव, निसर्ग, शेती, पशुपक्षी, सांस्कृतिक संचित यासह कृषिजीवनाचा मोठा अवकाश मराठी ललितगद्याने व्यापलेला आहे. याच परंपरेला पुष्ठ करणारे लेखन म्हणून भास्कर चंदनशिव यांच्या 'रानसय' व 'भिंगुळवाणा' या दोन ललितगद्याच्या पुस्तकांचा निर्देश आवश्यक ठरेल. झिजत जाणाऱ्या ग्रामसंस्कृतीचा लालित्यपूर्ण शोध यातून घेतलेला आहे. सर्वार्थाने बदलत जाणारे शेत-शिंवार, तेथील माणसे, समाजव्यवस्थेचे अध:पतन, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शासन-समाजाची त्यासंबंधीची भूमिका अशा अनेकविध आशयसूत्रांना कवेत घेऊन आजच्या कृषिवास्तवाचा धांडोळा या लेखनातून घेतला गेलेला आहे. खेड्यातील नातेसंबंधात निर्माण झालेला कोरडेपणा, नीतिमान जगण्यापेक्षा पैशाला प्राप्त होणारे महत्त्व, पर्यावरणाच्या लहरीपणामुळे खेड्याचे बिघडलेले स्वास्थ, भांडवली व्यवस्थेने उद्ध्वस्त होत असलेले ग्रामजीवन आदी प्रश्नांच्या अनुषंगाने मूल्ययुक्त आशय भास्कर चंदनशिव यांच्या ललितलेख संग्रहातून प्रकट झाला आहे. एकंदरीत ग्रामजीवनाची पडझड आणि मूल्यव्यवस्थेच्या ऱ्हासाचे वर्तमानातील समाजभान यातून व्यक्त झालेले आहे. ग्रामजीवनासह समग्र समाजव्यवस्थेत जी संभमावस्था निर्माण झालेली आहे तिचेही सूचन या लेखनातून झालेले आहे. प्रामुख्याने वर्तमानपत्रातील सदर लेखनाच्या लेखांचे हे एकत्रित संग्रह आहेत. सदर लेखनाच्या काही मर्यादा असतात. पण या मर्यादा ओलांडून कमी जागेत अर्थशील आशय गोळीबंदपणे चंदनशिव यांनी या लेखांतून व्यक्त केला आहे. वृत्तपत्रीय चौकटीपलिकडे त्याला वाङ्मयीन मूल्य प्राप्त करून देण्यात चंदनशिव यशस्वी झालेले दिसतात. अनुभवाची अस्सलता, निरीक्षणातील अर्थपूर्ण समाजभाष्ये आणि विचारसंपृक्तता हे या लेखनाचे महत्त्वाचे विशेष आहेत. त्यामुळेच हे लेखन मराठी ललितगद्यात दखलपात्र ठरते.

मराठीत आणि एकूणच साहित्यव्यवहारात संपादनांची परंपरा अजोड आहे. अनेक महत्त्वाच्या विषयावरील संपादनांना संदर्भग्रंथांचा दर्जा प्राप्त झालेला आहे. या संपादनांना हा दर्जा प्राप्त करून देण्यात संपादकांची चिकित्सक दृष्टी कारणीभूत ठरलेली आहे. संपादनाची एक शिस्त असते. ती पाळून ग्रंथाची अचूक उपयोगिता संपादकाने प्रक्षेपित करावयाची असते. अलिकडच्या काळात संपादने संख्येने उदंड झाली; परंतु संपादनशिस्तीच्या अभावामुळे ही संपादने संदर्भमूल्य प्राप्त करताना दिसत नाहीत. अर्थात आजही काही अपवादात्मक असे संपादन ग्रंथ गांभीर्यपूर्वक निर्माण केले जातात. ते संख्येने अल्प असले तरी महत्त्वाचे ठरलेले आहेत. भास्कर चंदनशिव यांची एकूण पाच संपादने प्रसिद्ध आहेत. ती संपादनशिस्तीला धरूनच संपादित केलेली असल्याने त्यांना संदर्भमूल्य प्राप्त झालेले आहे. मुळातच भास्कर चंदनशिव यांची वृत्ती ही वाङ्मय व्यवहाराकडे गांभीर्याने पाहण्याची आहे. हा त्यांचा दृष्टिकोन त्यांनी केलेल्या संपादनातही दिसतो. गंधखुणा (निवडक काव्य), ग्रामीण आत्मकथन, ज्योती म्हणे (म. फुले यांची अखंड काव्यरचना), गाथा (फ.



Scanned by CamScanner

मु. शिंदे यांचे काव्य), आणि सगनभाऊंची लावणी ही महत्त्वाची संपादने त्यांच्या नावावर आहेत. या संपादनांना लिहिलेल्या मर्मग्राही, विवेचक आणि अभ्यासपूर्ण प्रस्तावनांमुळे ही संपादने वैशिष्ट्यपूर्ण ठरलेली आहेत. प्रस्तावनांनमधून या ग्रंथाचे ऐतिहासिकत्त्व आणि त्यामधील आशयाच्या प्रस्तुततेचे चंदनशिव यांनी केलेले विश्लेषण हे त्यांच्या सखोल-समतोल व्यासंगाची साक्ष देणारे आहे. यादृष्टीने त्यांच्या 'जोती म्हणे' या संपादनाची प्रस्तावना अन्वयार्थक आहे.

भास्कर चंदनशिव यांच्या समग्र लेखनाची भूमी ही परिवर्तनवादी विचारभूमिकेच्या वैचारिक अधिष्ठानांवर उभी आहे. महात्मा जोतीराव फुले यांच्या तत्त्वज्ञानाच्या नजरेतून ते ग्रामीण जीवनाचे वाचन करतात. येथेच त्यांचे लेखन वेगळे ठरत मौलिकतेकडे जाते. ग्रामीण जीवनावर साहित्य लेखन करणाऱ्या आधुनिक काळातील सर्वच लेखक-कवींना ही नजर प्राप्त झाली असती; तर हे साहित्य खेड्यासंबंधीचे अक्षर ठरणारे काहीएक महत्त्वपूर्ण विधान करू शकले असते. ते विधान शेती प्रश्नांची दाहकता ध्वनित करण्यासाठी उपयुक्त आणि एकूणच मराठी साहित्याला नवी दिशा देणारे ठरले असते. महात्मा फुले यांच्यासह छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि शोषितांच्या उत्थानाचा ध्यास घेणाऱ्या पुरोगामी समाजपुरुषांच्या विचाराचा खोलवर संस्कार भास्कर चंदनशिव यांच्या व्यक्तिमत्त्वावर झालेला आहे. ऐंशीच्या दशकात उदयाला आलेल्या शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेबद्दल त्यांना विशेष आस्था होती. त्याचे कारण म्हणजे ही संघटना शेतकऱ्याच्या घामाच्या दामाचा जाब व्यवस्थेला विचारत त्यांचे प्रश्न कळकळीने मांडत होती. या संघटनेने आखलेल्या शेतकरी हिताच्या विचारचौकटीचा प्रभाव चंदनशिव यांच्यावर पडलेला दिसतो. ग्रामजीवनविषयक चळवळीबद्दलचे आकर्षण आणि बहुजनवादी विचारपरंपरेतील तत्त्वज्ञानाचा स्वीकार यामुळे भास्कर चंदनशिव यांच्या लेखनाला वैचारिक भूमिकेचा भक्कम आधार आहे. मातीशी नाते सांगणारी कोणतीही विचारधारा त्यांना स्वतःची वाटलेली आहे. म्हणूनच त्यांचे लेखन मानवी मूल्यांचा आग्रह धरत माणसाचा माणूस म्हणून नितळपणाने शोध घेते. ग्रामजीवनातील तळसमूहाच्या ताण्याबाण्याचा दर्दभरा आलेख मांडत वाचकांना अस्वस्थ करते. हे 'भूमी आणि भूमिकेचे साहित्य' मराठी साहित्याच्या कक्षा विस्तारणारे आहे. म्हणूनच हा लेखनऐवज मराठी साहित्यातली महत्त्वाची उपलब्धी आहे.


संदर्भ

१: नागनाथ कोत्तापल्ले, 'एक अस्सल माणूस : भास्कर चंदनशिव', प्रतिष्ठान, द्वैमासिक, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, नोव्हें.-डिसें. २००६/जाने.-फेब्रु. २००७,पृ.३१.

२. प्रल्हाद लुलेकर, 'भूमिकांचा ऐवज', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०२०, पृ.१६३.

३. जी. के. ऐनापुरे, 'मराठी कथा : मूल्य आणि ऱ्हास', ललित पब्लिकेशन, मुंबई, द्वितीयावृत्ती : २१ मे २०१६, पृ.२९.

४. आसाराम लोमटे, 'भूमी आणि भूमिकेशी ठाम असणारा कथालेखक', प्रतिष्ठान, द्वैमासिक, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, नोव्हें.-डिसें. २००६/जाने.-फेब्रु. २००७, पृ.५२.

५. केशव तुपे, 'साहित्य : सर्जन आणि संदर्भ', कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, १५ एप्रिल २००८, पृ.१२४.


दिलीप चव्हाण यांच्या 'कोरोना आपत्ती : स्त्रियांसाठी दुहेरी मार' या लेखाचा चौथा भाग पुढील अंकात प्रसिद्ध केला जाईल.

संपादक

'परिवर्तनाचा वाटसरू'चे लॉकडाऊनच्या काळातील डिजिटल अंक मिळाले नसल्यास पुढील भ्रमणध्वनीवर संपर्क करावा :

७०२८२०२०९२




Scanned by CamScanner